नूतन विद्यालय शिक्षण संस्था
सेलू जि.परभणी द्वारा संचालित

# कै. श्रीरामजी भांगडिया स्मारक व्याख्यानमाला

(स्थापना : १९७८)



## व्याख्यानमालेसंबंधी थोडेसे .....

कै. श्रीरामजी भांगडिया हे सेलू शहरातील एक सर्वसंपन्न व सर्वस्पर्शी व्यक्तिमत्व. प्रत्येक गावाला स्वत:चा एक चेहरा–मोहरा असतो. प्रत्येक गावाची स्वत:ची एक प्रवृत्ती असते आणि या प्रवृत्तीनुसार तेथील कार्य–कर्तृत्वातील विविधता ही त्या गावाच्या विकासाचा आलेख ठरत असते.

सेलू शहराच्या सर्वसंपन्न व्यक्तिमत्वासाठी कारणीभूत असणाऱ्या कै. श्रीरामजी भांगडिया यांच्या विधायक कार्यकर्तृत्वाचा आदर या शहरासाठी नेहमीच प्रेरणादायी ठरत आलेला आहे.

त्यांच्या कट्टर गांधीवादी विचारसरणीला साधन–सुचितेचा आधार होता. सर्वोदयी तत्त्वज्ञानाचा त्यांचा आग्रह त्यांच्या राजकिय कर्तृत्वाला नैतिक अधिष्ठान देऊन होता. त्यामुळे विधायक निर्मितीमूल्य घेऊनच त्यांनी अविरत श्रम घेतले.

नगराध्यक्ष पदाची धुरा सांभाळत असतांनाच पाव शतकापर्यंत सेलू शहराची जडण–घडण आदर्श पातळीवर नेऊन त्यांनी पोंचवली. शेतीमध्ये सतत व सातत्याने प्रयोग करुन सहकाऱ्यांना, नवीनांना व इतरांना शेती तज्ज्ञ बनवित राहिले. दलितांसाठी शेवटपर्यंत आपल्या हक्कांची जाणीव करुन देत त्यांना प्रस्थापित केले. दलितमित्र भांगडिया यांनी कुठल्याही सनातन व पारंपारिक संकेतांना बळी न पडता पुरोगामी दृष्टिकोनातूनच शेवटपर्यंत आपले सामाजिक कर्तव्य पार पाडले. या सर्व जबाबदाऱ्यांना समर्थपणे पेलता यावे म्हणून त्यांनी स्वत:चा संसार उभार केला नाही व संन्यस्त व समर्पित जीवन व्यतीत केले.

कै. भांगडियाजी यांचे कार्य एका छोट्या शहरापुरते जरी मर्यादित असले तरी त्यांच्या या मर्यादित कार्यक्षेत्राला सर्वस्पर्शी असे सामाजिक अधिष्ठान होते हे आम्ही नम्रपणे येथे नमूद करु इच्छितो. समाजकारण, राजकारण, शिक्षण, शेती, दलितोद्धार अशा विविध कार्यांच्या द्वारे त्यांनी विधायक व रचनात्मक दृष्टिकोनातून या शहराचा परिपूर्ण विकास घडविण्याच्या कामी सर्वतोपरी प्रयत्न केले.

स्वत:चे शिक्षण जेमतेम चौथ्या इयत्तेपर्यंत असूनही नूतन विद्यालय शिक्षण संस्थेची स्थापना व त्याचा परिपूर्ण विस्तार हे त्यांनी आपले ध्येय ठरविले व पूर्ण केले. आमच्या शिक्षण संस्थेचा आजचा विस्तार चार बालवाड्या, स्वतंत्र प्राथमिक शाळा, मुलींचे आणि मुलांचे अशी दोन स्वतंत्र हायस्कूल, मुलींचे आणि मुलांचे अशी कनिष्ठ महाविद्यालये आणि तिन्हीही विद्याशाखेची शिक्षण देणारे ज्येष्ठ महाविद्यालय ही त्यांच्याच प्रयत्नांची फलश्रुती आहे.

२ जुलै १९७७ रोजी त्यांना देवाज्ञा झाली व एक समर्पित जीवन आपल्या आदर्शाचा कार्यसुगंध मागे ठेवून गेले.

आम्ही त्यांच्या ध्येय मार्गावरचे फक्त नम्र पाईक आहोत. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे नेहमीच पुण्यस्मरण व्हावे व सतत आम्हाला प्रेरणा मिळाव्यात या हेतूने व वैचारिक प्रबोधनाच्या हेतूने उत्साहित होऊन आम्ही त्यांच्या स्मरणार्थ ही व्याख्यानमाला आयोजित केली आहे.

कै. श्रीरामजी भांगडिया यांच्या स्मरणार्थ आम्ही सुरु केलेल्या या व्याख्यानमालेत आजपर्यंत ज्या सर्वश्रुत व्यासंगी विद्वत जनांची व्याख्याने झाली आहेत त्यांची नोंद सोबत देत आहोत.

## व्याख्यानमाले अंतर्गत आयोजित व्याख्यानांची सूची

| अ.क्र. | वक्त्याचे नांव | विषय |
|---|---|---|
| १ | प्रा. नरहर कुरुंदकर | हैद्राबाद मुक्तिसंग्राम : काही चिंतन. |
| २ | डॉ. य. दि. फडके | जनता राजवटीची दोन वर्षे. |
| ३ | प्राचार्य राम शेवाळकर | रामायण : तीन दृष्टिकोन. |
| ४ | न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी | लोकनीती व कायद्याचे राज्य. |
| ५ | श्री ना. ग. गोरे | २१ व्या शतकातील भारत कसा असावा. |
| ६ | प्रा. कृ. दि. बोराळकर | लोकशाही व स्वातंत्र्य. |
| ७ | प्रा.डॉ. यू. म. पठाण | संत एकनाथ : एक आगळे संतत्व |
| ८ | श्री गंगाप्रसादजी अग्रवाल | मानवतेपुढील ज्वलंत आव्हाने. |
| ९ | प्रा. एच.एम.देसरडा | महाराष्ट्रातील नियोजनासमोरील आव्हाने आणि विकासाच्या पर्यायी संकल्पना. |
| १० | प्रा. जनार्दन वाघमारे | म.फुले आणि डॉ.आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार. |
| ११ | प्रा.सौ. कमल ठकार | साने गुरुजी व भारतीय संस्कृती |
| १२ | श्री जयंत नारळीकर | खगोलशास्त्रातून दिसणारे विश्व. |
| १३ | श्री विद्याधरजी गोखले | मन करा रे प्रसन्न, हत्तीला हवा अंकुश. |
| १४ | श्री विजय तेंडूलकर | समाज एक चिंतन, नाटक मुक्तचिंतन. |
| १५ | न्या.नरेंद्र चपळगांवकर | स्वामी रामानंद तीर्थ आणि त्यांचा काळ. |
| १६ | श्री विजय कुवळेकर | स्वातंत्र्यानंतर मूल्यांचा शोधात. |
| १७ | श्री राजीव दीक्षित | आजादी बचाओ आंदोलन. |
| १८ | डॉ. माधवराव चितळे | नैसर्गिक साधनांचा विकास. |
| १९ | डॉ. लक्ष्मण देशपांडे | आमची सांस्कृतिक आव्हाने. |
| २० | श्री बिंदूमाधव जोशी | आजची अर्थव्यवस्था व आपण. |
| २१ | श्री विजयअण्णा बोराडे | शेती, माती आणि पाणी. |
| २२ | श्री द.मा. मिरासदार | विनोदाचे आख्यान : पूर्वरंग |
| २३ | प्रा. शेषराव मोरे | काश्मीर प्रश्नाची खरी कहाणी. |
| २४ | डॉ. जगदीश हिरेमठ | हृदय रोग टाळा. |
| २५ | डॉ. अरुण निगवेकर | १२ वे शतक : ज्ञानाचे शतक |
| २६ | प्रा. हरि नरके | घटनाकारांना अपेक्षित भारत व स्वातंत्र्याची ६० वर्षे |
| २७ | श्री पोपटराव पवार | ग्रामविकास व जलसंधारण : काळाची गरज |
| २८ | श्रीमती मेधा पाटकर | विकास आणि विस्थापना |
| २९ | श्री मधुकर भावे | महाराष्ट्राची ५० वर्षे |
| ३० | डॉ. डी.एन.धनागरे | भारतातील उच्चशिक्षणाचे व्याव-सायीकरण व गुणवत्तेचे प्रश्न. भारतातील विदेशी विद्यापीठाचे प्रस्तावित आगमन : आपत्ती की आव्हान. |
| ३१ | डॉ. दिपक तिळक | लोकमान्य टिळकांच्या कल्पनेतील गणेशोत्सव व सद्यस्थिती |
| ३२ | डॉ. उमाकांत राठोड | महाराष्ट्राच्या जडण घडणीत मा.वसंतरावजी नाईक यांचे योगदान. |
| ३३ | डॉ. विश्वांभर चौधरी | भारत २०२५ |
| ३४ | डॉ. विकास आमटे | बाबा आमटे एक आनंद प्रवास |
| ३५ | डॉ. सोमनाथ रोडे | जागतिक परिप्रेक्ष्यामध्ये महात्मा गांधीचे विचार |
| ३६ | डॉ.दत्तप्रसाद दाभोळकर | नर्मदा प्रकल्पाची शोधयात्रा. स्वामी विवेकानंदांची खरी ओळख |
| ३७ | डॉ. प्रदीप पुरंदरे | मराठवाड्याचा पाणी प्रश्न : एक चिंतन |
| ३८ | डॉ. सुनिलम (माजी आमदार मध्यप्रदेश) | गांधी और लोकतंत्र. |
| ३९ | प्राचार्य डॉ. दत्ता भगत | स्वातंत्र्य लढा : गांधी आणि आंबेडकर |
| ४० | डॉ. उदय निरगुडकर | उगवता भारत |
| ४१ | श्री लक्ष्मीकांत देशमुख | बारडोली,दांडी ते पुणतांबा अर्थात शेतकरी प्रश्न : काल - आज - उद्या. |
| ४२ | डॉ. रामचंद्र देखणे | शिक्षण, परंपरा आणि प्रबोध. |

### शालेय स्तरावरील व्याख्यान

| अ.क्र. | वक्त्याचे नांव | विषय |
|---|---|---|
| १ | डॉ. द्वा. र. जरीवाला | स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन. |

### अधिवेशन

| अ.क्र. | वक्त्याचे नांव | विषय |
|---|---|---|
| १ | उद्घाटक डॉ.ना.य.डोळे | महाराष्ट्रातील सार्वजनिक व्याख्यानमालेच्या समन्वय समितीचे अधिवेशन (३ व ४ फेब्रु. २००१) |

# मागील
# तीन वर्षातील
# व्याख्यानांचा
# आढावा

# पुष्प ४२ वे

दिनांक : २१ ऑगस्ट २०१८

वक्ते : डॉ. रामचंद्र देखणे
(प्रसिद्ध साहित्यीक व संतसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक)

विषय : शिक्षण – परंपरा आणि प्रबोध.

कै. श्रीरामजी भांगडिया स्मारक व्याख्यानमालेचे ४२ वे पुष्प डॉ. रामचंद्र देखणे यांनी गुंफले. "शिक्षण – परंपरा आणि प्रबोध" या विषयावर आपले विचार मांडतांना ते म्हणाले जे दिल्याने वाढते, ते ज्ञानधन फक्त शिक्षकांकडे असल्याने शिक्षक हा जगातील सर्वात श्रीमंत माणूस आहे.

अंध:काराला सांडत, कोंडत, उजेडाला मांडण्याचे सामर्थ्य फक्त शिक्षकांकडे आहे.

त्यामुळे सुशिक्षित, सुसंस्कृत व मुल्याधिष्टीत समाजाच्या निर्मितीमध्ये त्यांचे योगदान मोलाचे आहे. प्रवचन, कीर्तन, भारुड, व्याख्याने या सारख्या अनेक माध्यमातून शिक्षणाची व समाज प्रबोधनाची परंपरा भारतीय भारतीय संस्कृतीमध्ये अनादी कालापासून आहे. ती संवर्धित व्हावी यासाठी समाज धुरीणांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.



सस्नेह

# निमंत्रण

नूतन विद्यालय शिक्षण संस्था,सेलू जि.परभणी

## कै.श्रीरामजी भांगडिया स्मारक व्याख्यानमाला

### पुष्प ४२ वे



दिनांक : २१ ऑगस्ट २०१८ (मंगळवार)
वेळ : सायंकाळी ०५:३० वा.
स्थळ : कै.रा.ब.गिल्डा सभागृह नूतन विद्यालय,सेलू

श्री/सौ. ..................................................................

सप्रेम नमस्कार,

शिक्षण आणि प्रबोधनाच्या माध्यमातून प्रबुध्द समाजाच्या जडणघडणीची परंपरा कालनिरपेक्ष आहे. ती काल होती,आज आहे उद्या ही राहील. या प्रबोधन परंपरेचा मागोवा घेण्यासाठी आयोजित व्याख्यानासाठी आग्रहपूर्वक निमंत्रण.

**वक्ते : डॉ. रामचंद्र देखणे**
(प्रसिध्द साहित्यीक व संतसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक)

**विषय : शिक्षण-परंपरा आणि प्रबोध**

●।। विनीत ।।●

डॉ.एस.एम.लोया
(अध्यक्ष,नू.वि.शि.सं.सेलू)

श्री डी.के.देशपांडे
(चिटणीस,नू.वि.शि.सं.सेलू)

प्राचार्य.डॉ.शरद कुलकर्णी
(संयोजक)

प्रा.सुभाष बिरादार
(सहसंयोजक)

(कै.श्रीरामजी भांगडिया स्मारक व्याख्यानमाला)

# समाजाभिमुख शिक्षण काळाची गरज - प्रा.देखणे

सेलू / प्रतिनिधी

शिक्षण हे मूल्याधिष्टीत असावे. जीवन शिक्षण प्रणाली विकसित व्हावी. जीवन कौशल्य वाढवितानाच स्वावलंबी शिक्षण मिळवे. सुशिक्षित, सुसंस्कृत समाज निर्माणासाठी समाजाभिमुख शिक्षण ही काळाची गरज आहे,असे प्रतिपादन पुणे येथील संत साहित्याचे अभ्यासक प्रा.डॉ. रामचंद्र देखणे यांनी केले.



नूतन विद्यालय शिक्षण संस्था संचलित कै.श्रीरामजी भांगडिया स्मारक व्याख्यानमालेचे ४२ वे पुष्प मंगळवारी (दि. २१) नूतन विद्यालयाच्या कै.रा.ब.गिल्डा सभागृहात 'शिक्षण-परंपरा आणि प्रबोध' या विषयावर संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था सचिव डी.के.देशपांडे हे होते. तर सहसचिव प्राचार्य डॉ.विनायक कोठेकर, माजी सचिव प्राचार्य द.रा.कुलकर्णी यांची उपस्थिती होती. आजच्या बदलत्या काळात विद्यार्थ्यांचे सामाजिकरण घडतांनाच त्यांच्यात चारित्र्य, विनम्रता, व्यवहारीकता, बहुश्रुतता वृध्दींगत व्हावी. माणूस जोडणारे, घडवणारे शिक्षण मिळावे, असे प्रा.डॉ.देखणे म्हणाले.

कार्यक्रमाची सुरूवात अशोक लिंबेकर लिखित, सच्चिदानंद डाखोरे यांनी संगीतबध्द केलेल्या व विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गोंधळाने झाली. प्रास्ताविक संयोजक प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन व्याख्यानमालेचे सहसंयोजक प्रा.सुभाष बीराजदार यांनी केले तर अशोक लिंबेकर यांनी आभार मानले.


नूतन विद्यालय शिक्षण संस्था, सेलू जि. परभणी
कै. श्रीरामजी भांगडिया स्मारक व्याख्यानमाला
पुष्प ४२ वे
* वक्ते *
(प्रसिध्द साहित्यीक व संत साहित्याचे अभ्यासक)
* विषय *



# पुष्प ४१ वे

दिनांक : २७ मार्च २०१८

वक्ते : श्री लक्ष्मीकांत देशमुख
(अध्यक्ष, ९१ वे अ.भा. मराठी साहित्य संमेलन)

विषय : बारडोली, दांडी ते पुणतांबा अर्थात शेतकरी प्रश्न काल – आज – उद्या.

शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर "बारडोली, दांडी ते पुणतांबा अर्थात शेतकरी प्रश्न काल – आज – उद्या" या विषयावर आपले विचार मांडतांना ९१ व्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा. लक्ष्मीकांत देशमुख म्हणाले, भारतीय आर्थिक विकासाची फळे शेतकऱ्यांपर्यंत पोंहचलीच नाहीत. त्यामुळे आत्महत्येचा पर्याय तो स्विकारतांना दिसतो. शेती व शेतकऱ्याची अवस्था बदलण्यासाठी व्यवस्था परिवर्तनाची गरज आहे.

शेतीमालाला वाजवी दर मिळत नसल्यामुळे न परवडणारी शेती हे शेतकऱ्यांचे खरे दु:ख आहे. त्यावर वेळीच उपाय न शोधल्यास भारतीय कृषी व्यवस्था पर्यायाने समाज व्यवस्था, अर्थव्यवस्था उद्धस्त होण्यासाठी वेळ लागणार नाही.



।। निमंत्रण ।।

नूतन विद्यालय शिक्षण संस्था,
सेलू जि.परभणी.



## कै. श्रीरामजी भांगडिया स्मारक व्याख्यानमाला

पुष्प ४१ वे

श्री./सौ.............................................

.........................................................

सप्रेम नमस्कार,

"कर्जात जन्मतो, कर्जात वाढतो व कर्जातच मरतो." भारतीय शेतकऱ्यांच्या बाबतीत अधोरेखित होणारे हे कटूसत्य स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतरही आपण बदलू शकलो नाही, हे भयावह वास्तव मान्य करण्याची संवेदनशिलता हरवून बसलेल्या समकालीन वास्तवाचा वेध घेण्यासाठी.....

## बारडोली, दांडी ते पुणतांबा अर्थात शेतकरी प्रश्न काल-आज-उद्या



या ज्वलंत विषयावर आयोजित
व्याख्यानासाठी
आग्रहपूर्वक निमंत्रण.

वक्ते : **मा.श्री लक्ष्मीकांत देशमुख**
(अध्यक्ष, ९१ वे अ.भा.मराठी साहित्य संमेलन)

विनीत

**डॉ.एस.एम.लोया**
अध्यक्ष, नूतन विद्यालय शिक्षण संस्था, सेलू.

**श्री डी.के.देशपांडे**
चिटणीस, नूतन विद्यालय शिक्षण संस्था, सेलू.

**प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी**
संयोजक

**प्रा.सुभाष बिरादार**
सहसंयोजक

(कै.श्रीरामजी भांगडिया स्मारक व्याख्यानमाला)

..............................................................

**दिनांक** : २७/०३/२०१८ (मंगळवार)
**वेळ** : सांय.०५.३० वा.
**स्थळ** : नूतन विद्यालय, सेलू जि.परभणी.

लोकमत

**सेलू येथे व्याख्यान : लक्ष्मीकांत देशमुख यांची अपेक्षा**

# शेतकऱ्यांच्या मालाला दीडपट भाव मिळावा

लोकमत न्यूज नेटवर्क

शंभू काकडे सेलू



**सेलू :** शेतकऱ्यांच्या हितासाठी शासन, प्रशासन काही करीत नाही. शेतकऱ्यांना वाजवी भाव मिळत नाही. न परवडणारी शेती हे शेतकऱ्यांचे खरे दु:ख असून शेतकऱ्यांच्या सुखासाठी शेतमालाला दीडपट भाव मिळाला पाहिजे, असे प्रतिपादन ९१ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले.

सेलू येथील नूतन विद्यालय शिक्षण संस्था संचलित कै. श्रीरामजी भांगडिया स्मारक व्याख्यानमालेत आयोजित बारडोली, दांडी ते पुणतांबा अर्थात 'शेतकरी प्रश्न काल-आज-उद्या' या विषयावर मार्गदर्शन करताना २८ मार्च रोजी देशमुख बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस.एम. लोया तर प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार स्वरुप कंकाळ, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष गोविंद जोशी, संस्था सचिव डी.के. देशपांडे, प्राचार्य डॉ. व्ही.के. कोठेकर, जयप्रकाश बिहाणी आदींची उपस्थिती होती. यावेळी देशमुख म्हणाले, भारतीय आर्थिक विकासाची फळे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले नाहीत. आजच्या काळात शेतकरी कर्जात जन्मतो, जगतो व कर्जातच मरतो, अशी त्याची अवस्था झाली आहे. बारडोलीचा सत्याग्रह आदर्श शेतकरी लढा होता. तर पुणतांब्याचे अभिनव आंदोलन शेतकरी आंदोलनाला नवी दिशा देणारे ठरले आहे, असे त्यांनी सांगितले. प्रत्येक गावामध्ये गोदाम निर्माण होणे आवश्यक असल्याचेही देशमुख यांनी मत व्यक्त केले. तत्पूर्वी सच्चिदानंद डाखोरे आणि गीत मंचच्या विद्यार्थ्यांनी शेतकरी गीत आणि जात्यावरची ओवी सादर केली. संयोजक प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. सुभाष बिराजदार यांनी सूत्रसंचालन केले. अशोक लिंबेकर यांनी आभार मानले.

Hello Parbhani
Page No. 6 Mar 30, 2018
Powered by: erelego.com


नूतन विद्यालय शिक्षण संस्था,सेलू संचालित
ता.सेलू जि.परभणी.
कै.श्रीरामजी भांगडिया
स्मारक व्याख्यानमाला
पुष्प - ४१ वे
विषय:-बारडोली ,दांडी ते पुणतांबा
अर्थात (शेतकरी प्रश्न काल -आज -उद्या)
वक्ते:-मा.श्री.लक्ष्मीकांत देशमुख
अध्यक्ष (९१ वे अ.भा.मराठी साहित्य संमेलन)



# पुष्प ४० वे

दिनांक : २६ मार्च २०१७

वक्ते : डॉ. उदय निरगुडकर
(संपादक, झी चोवीस तास)

विषय : उगवता भारत.

एके काळी स्वप्नाळू, निद्रिस्थ, अस्वस्थ असलेला भारत महत्वाकांक्षी होतोय. स्वप्न प्रत्यक्षात उतरवणाऱ्या तरुणाईची संख्या भारतात वाढतेय. विज्ञान, तंत्रज्ञानाच्या बळावर नवा भारत घडतोय असे प्रतिपादन डॉ. उदय निरगुडकर यांनी "उगवता भारत" या विषयावर बोलतांना केले. भारतात शिक्षणाचे प्रमाण वाढले पण सोबतच अंधश्रद्धा ही वाढल्या आहेत. जातीयवाद आणि धर्मांधता ही वाढत आहे. विशिष्ट समाजात असुरक्षितता व अन्यायाची भावना वाढतेय.

मोबाईल आणि संगणक क्रांती झाली असली तरीही आरोग्य, शिक्षण, पाणी या सारख्या प्राथमिक गरजाही पूर्ण होतांना दिसत नाहीत. त्यामुळे संताप वाढतोय, तरीही भारतीयांमध्ये असलेल्या विधायक शक्तीचा व उर्जेचा सकारात्मक वापर केल्यास भविष्यात बलशाली व संपन्न भारताचे चित्र साकार करणे कठीण नाही.





**नूतन विद्यालय शिक्षण संस्था,**
सेलू जि. परभणी

## कै. श्रीरामजी भांगडिया स्मारक व्याख्यानमाला

पुष्प – ४० वे

श्री / सौ. ..........................................
..........................................

**व्याख्यान**
रविवार, दि. २६ मार्च २०१७
**वेळ** – सायं. ५ वा.
**स्थळ** – नूतन विद्यालय, सेलू.

सस्नेह नमस्कार

भारतीय स्वातंत्र्याला ७० वर्षे पूर्ण होत असतांना विश्वापुढे आपल्या बलस्थानांसह देश व्यक्त होत आहे. विश्व त्याचे औत्सुक्यादराने स्वागत करीत आहे. या गतिमान कालगतीत अल्पसा थांबा घ्यावा; आपणासारख्या नागरिकांसह चिंतन करावे यासाठीच व्याख्यानाचे आयोजन केले आहे. या प्रसंगी आपल्या उपस्थितीने चिंतन प्रवाहास अधिक गती येईल. अगत्यपूर्वक उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

**वक्ते – मा. डॉ. उदय निरगुडकर**
(संपादक, झी चोवीस तास)
**विषय – उगवता भारत**

विनीत

**डॉ. एस.एम. लोया**
(अध्यक्ष, नू.वि.शि.संस्था सेलू.)

**डी.के. देशपांडे**
(चिटणीस, नू.वि.शि.संस्था सेलू.)

**प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी**
संयोजक

**प्रा. सुभाष बिरादार**
सहसंयोजक

कै. श्रीरामजी भांगडिया स्मारक व्याख्यानमाला




**समकालीन समस्यांची रोखठोक उकल करणारे संवादी वक्ते**

दैनिक दिव्य मराठी
महाराष्ट्राचे एकमेव निःपक्ष आणि स्वतंत्र वृत्तपत्र
एकूण पाने : १६+८+४=२८ | किंमत ₹ ४.०० | वर्ष ६ | अंक २९९ | महानगर
औरंगाबाद | मंगळवार, २८ मार्च २०१७

**व्याख्यानमाला** | नुतन विद्यालय शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजीत व्याख्यानमालेतील ४० वे पुष्प गुंफतांना उदय निरगुडकर यांचे प्रतिपादन

# देशात तरुणाईची संख्या वाढल्याने नवा भारत घडतो आहे

प्रतिनिधी । सेलू

एके काळी स्वप्नाळू, निद्रीस्त, अस्वस्थ असलेला भारत महत्वाकांक्षी होतोय. स्वप्न प्रत्यक्षात उतरवणाऱ्या तरूणाईची संख्या भारतात वाढतेय. विज्ञान तंत्रज्ञानांच्या बळावर नवा भारत घडतोय असे प्रतिपादन संपादक डॉ. उदय निरगुडकर यांनी केले.

नूतन विद्यालय शिक्षण संस्था संचलित श्रीरामजी भांगडीया स्मारक व्याख्यानमालेचे ४० वे पुष्प प्रसंगी 'उगवता भारत' या विषयावर ते बोलत होते. यावेळी व्यासपिठावर संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. बसंतराव खारकर, सचिव डी.के.देशपांडे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलतांना डॉ. उदय निरगुडकर म्हणाले की, भारतात शिक्षणाचे प्रमाण वाढले पण, सोबतच अंधश्रद्धा ही वाढल्या आहेत. बुवा- बाबांच्या मठांची संख्या ही वाढली. नव्याने आज जातीयवाद, धर्मांधता वाढतेय. विशिष्ट समाजात असुक्षिता, अन्यायाची, असंतुष्टतेची भावना वाढतेय. शिक्षण व्यवस्था, शेतकऱ्यांच्या बाबतीतील प्रश्न वाढत आहेत. आर्थिक विषमताही वाढत आहे. आपण मोबाईल, संगणक क्रांती केली तरी आजही लाखो लोक पाण्यासाठी वनवन भटकत आहेत. माणसातल माणूसपण हरवून कोरडे नाते संबंध वाढीस लागली आहेत. राग संताप वाढतोय. नैसर्गिक साधन संपत्तीचा भरमसाठ वापर होतोय. ही अशी अव्हानही आज भारतात उभी ठाकली आहेत. भारतासमोरील प्रत्येक प्रश्न सोडविण्यासाठीची उर्जा मुळातच आपल्यात आहे. ती विधायकतेची शक्ती जागी करायला हवी. अशी भावनाही डॉ. उदय निरगुडकर यांनी व्यक्त केली. कार्यक्रमास संस्थेचे सहसचिव प्राचार्य विनायकराव कोठेकर, जयप्रकाश बिहाणी, संस्थेचे पदाधिकारी, शिक्षण, समाज, साहित्य, राजकीय, उद्योग क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केले. आभार अशोक लिंबेकर यांनी मानले.



## साहित्यिक, नाट्य कलावंत व शिक्षकांबरोबर संवाद

नूतन विद्यालय शिक्षण संस्था संचलित श्रीराजी भांगडीया स्मारक व्याख्यानमालेसाठी संपादक उदय निरगुडकर यांनी नूतन विद्यालयाच्या सभागृहात शिक्षकांशी शैक्षणिक संवाद साधला. शासकीय विश्राम गृहात परभणी, सेलू, जिंतूरच्या शब्दसह्याद्री प्रतिष्ठानच्या सदस्यांशी, नाट्य कलावंतांशी संवाद साधला. या प्रसंगी गटशिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे, कवी डॉ. केशव खटींग, प्रा.बाळू बुधवंत,प्रा.ए.डी.कुलकर्णी, रोहीणी कुलकर्णी ,जयश्री सोन्नेकर, गौतम सुर्यवंशी, शरद ठाकर यांची उपस्थिती होती .



